# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

### नागपूर मेट्रोच्या ३ दिवसीय क्रीडा कार्यक्रमाची आजपासून सुरुवात मैदानी आणि अमैदानी खेळांत कर्मचारी घेणार सहभाग




नागपूर : महा मेट्रोचा यावेळी दहावा वर्धापन दिवस साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. याच अनुषंगाने आजपासून ३ दिवसीय क्रीडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या मध्ये मैदानी तसेच बैठे खेळांचा समावेश करण्यात आला आहे. धनवटे नॅशनल कॉलेजच्या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मध्ये आजपासून हा महोत्सव सुरु झाला आहे. या क्रीडा सप्ताहचे आयोजन १८ फेब्रुवारी रोजी असणाऱ्या नागपूर

मेट्रोच्या दहाव्या वर्धापन दिना निमित्त करण्यात आले आहे. आज महा मेट्रोचे संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) श्री. अनिल कोकाटे, संचालक(वित्त) श्री. हरेंद्र पांडे यांच्या हस्ते विधीवत दीप प्रज्वलन करून या क्रीडा सप्ताहची सुरुवात करण्यात आली, यावेळी श्री. सुधाकर उराडे,श्रीमती कुमकुम मिश्रा,पवन वर्मा,नरेंद्र उपाध्याय,साईशरण दीक्षित,अभिजित मंडल,नरेंद्र अहिर उपस्थित होते.

गेल्या वर्षी झालेल्या अशाच क्रीडा स्पर्धांमध्ये जिंकलेल्या कर्मचाऱ्यांना मेट्रो भवन येथे वर्धापन दिनाच्या दिवशी महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते मोमेंटो आणि बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले होते. यंदा चालणाऱ्या या ३ दिवसीय क्रीडा मध्ये मैदानी खेळांमध्ये २५ क्रिकेट, आणि अमैदानी खेळात, १५३ बॅडमिंटन,५२टेबल टेनिस, ५२ चेस, ११४ कॅरम सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामध्ये ६०० कर्मचाऱ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला आहे. तसेच पेंटिंग आणि रांगोळी स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आले आहेत. या स्पर्धेच्या निमित्ताने कार्यालयीन कामाव्यतिरिक्त मिळणाऱ्या आवडीच्या खेळातील सहभागामुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह आहे.

